


दैनिक
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ११९। किंमत - २ रू. संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) मंगळवार । १९/०५/२०२६ । पाने - ४







# नाशिक- पुणे रेल्वे मार्ग जनतेच्या हक्काचा - आ. तांबे

## केंद्रीय रेल्वे मंत्रालयाची महाराष्ट्राला सावत्र वागणूक

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

महाराष्ट्राच्या उद्योग ,शिक्षण, कृषी आणि रोजगार क्षेत्राला गती देण्याची क्षमता असलेला पुणे नाशिक सरळ रेल्वे मार्ग हा प्रकल्प साकारण्यासाठी माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली या भागातील जनतेने मोठा पाठपुरावा केला आहे. मात्र केंद्राच्या नव्या निर्णयाने हा मार्ग डावलून आता अहमदाबाद धानोरा रेल्वे मार्गाला पहिला सेमी हाय स्पीड रेल्वे मार्ग म्हणून प्राधान्य दिले आहे यामुळे नाशिक पुणे रेल्वे मार्ग होतो की नाही ही शंका निर्माण झाल्या असून हा मार्ग या भागातील जनतेच्या हक्काचा असल्याने या रेल्वे मार्गासाठी संघर्ष करणार असल्याचे आमदार सत्यजित तांबे यांनी म्हटले आहे

नाशिक पुणे रेल्वे ऐवजी गुजरात मधील अहमदाबाद धोलेरा या पहिल्या सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्पाला केंद्र सरकारने मंजुरी दिल्यानंतर आमदार सत्यजित तांबे यांनी नाशिक पुणे रेल्वे बाबत मागणी करत आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. यावेळी ते म्हणाले की माजी मंत्री थोरात यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने देशातील पहिला सेमी हायस्पीड रेल्वे मार्ग असलेला नाशिक पुणे रेल्वे नाशिक सिन्नर संगमनेर नारायणगाव राजगुरुनगर चाकण पुणे या मार्गाने मंजूर केला. २०१८ मध्ये या प्रकल्पाला मान्यता मिळाली. या मार्गासाठी संगमनेर तालुक्यासह जुन्नर तालुक्यातील आज



जमिनीचे अधिग्रहणही करण्यात आले. सुमारे २३० कोटी रुपये शेतकऱ्यांना दिले गेले. रेल्वे संगमनेर या सरळमार्गे होणार असल्याने या भागातील नागरिक शेतकरी व युवक वर्ग मोठा आनंदित होता.

मात्र मध्यंतरी सरकारने शिर्डी अहिल्यानगर आणि पुणे असा मार्ग केल्याने या मार्गावरील सर्व तालुक्यांमध्ये मोठी नाराजी पसरली. सर्व लोकप्रतिनिधींसह सर्वांनी एकत्रित येऊन संघर्ष केला. याबाबत माजी मंत्री थोरात यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन हा रेल्वे मार्ग सरळ व्हावा याबाबत विनंती केली. त्यानंतर त्यांनी सकारात्मक प्रतिसादही दिला. आपण वेळोवेळी विधानपरिषदेमध्ये नाशिक रेल्वे बाबत आवाज उठवला. मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला.

या मार्गावरील सर्व लोकप्रतिनिधींना एकत्र घेऊन हा मार्ग सरळ मार्गे व्हावा यासाठी सरकारला विनंती केली . मात्र आता केंद्र सरकारने नव्याने राज्यात होणाऱ्या पुणे नाशिक पहिल्या सेमी हाय स्पीड रेल्वे प्रकल्पाच्या ऐवजी गुजरात मधील अहमदाबाद ते धोलेरा या १३० किलोमीटर मार्गासाठी सुमारे २०,६६७ कोटी रुपये खर्चाला मंजुरी दिली आहे. त्यामुळे नाशिक पुणे हा रेल्वे मार्ग गुंडाळला जातो की काय अशी शंका सर्व नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

नाशिक पुणे सेमी हायस्पीड रेल्वे मार्ग हा संगमनेर सरळ मार्गे झाला पाहिजे ही आमची आग्रही मागणी असून यातून या विभागातील आसपासच्या सर्व तालुक्यांमधीलही विविध क्षेत्राला प्रगतीला गती मिळणार आहे. त्यामुळे हा मार्ग होण्यासाठी रस्त्यावर उतरून संघर्ष केल्याशिवाय पर्याय नसल्याचेही आमदार सत्यजित तांबे यांनी म्हटले आहे.

# पाणीटंचाई निवारणास सर्वोच्च प्राधान्य - ना. विखे

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-

संगमनेर तालुक्यातील पाणीटंचाई निवारणाच्या कामास सर्वोच्च प्राधान्य द्यावे. प्रशासकीय कार्यवाही वेळेत पूर्ण करून गावे व वाड्यांना विनाविलंब पाणी उपलब्ध करून द्यावे. पिण्याच्या पाण्याचे नियोजन अत्यंत काटेकोरपणे करावे. कामात दिरंगाई वा हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करण्यात यावी. तसेच, नागरिकांना केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष पाणी मिळवून देण्यावर प्रशासनाने भर द्यावा, असे निर्देश राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले. संगमनेर येथे तालुकास्तरीय पाणीटंचाई व चाराटंचाई निवारणासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबतची आढावा बैठक पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस आमदार अमोल खताळ, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, उपविभागीय अधिकारी अरुण उंडे, गटविकास अधिकारी




प्रवीण सिनारे उपस्थित होते. यासोबतच, स्थानिक लोकप्रतिनिधी, नागरिक व विविध शासकीय विभागांचे अधिकारी या बैठकीस उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, सध्या तालुक्यात १९ टँकरांद्वारे २५ गावे व ५४ वाड्यांमधील नागरिकांना पाणीपुरवठा सुरू असून, हे पाणी शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासनाने सूक्ष्म नियोजन करावे. टँकर्सचे वेळापत्रक तयार करून गावकऱ्यांना आगाऊ माहिती द्यावी. टँकर गावात पोहोचल्यावर ग्रामसेवक व तलाठी यांची प्रत्यक्ष उपस्थिती अनिवार्य राहील. आरोग्याच्या दृष्टीने टँकरचे पाणी थेट विहिरीत न सोडता, लोकसंख्येनुसार पाचशे किंवा हजार लिटर क्षमतेच्या प्लास्टिकच्या टाक्यांमध्ये सोडावे व त्यांना तोटी बसवून पाण्याचे वितरण करावे, असे डॉ. विखे पाटील यांनी सुचविले.

नद्यांचे वाढते प्रदूषण व पिण्याच्या पाण्याची खालावलेली गुणवत्ता हा अत्यंत चिंतेचा विषय आहे. कालवे व नद्यांमध्ये प्रदूषित सांडपाणी सोडणाऱ्या नगरपालिका व कारखान्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सांडपाणी प्रकल्पांची योग्य अंमलबजावणी न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल केले जातील व संबंधित उपअभियंत्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली जाईल. नागरिकांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड होऊ नये, यासाठी पिण्याच्या पाण्याचे शंभर टक्के नमुने तपासून त्यांची नोंद ठेवण्याच्या स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या.

टंचाईच्या काळात पिण्याचे पाणी सुरळीत ठेवण्यासाठी वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. वीजपुरवठ्यातील अनियमिततेमुळे नागरिकांना पाणी न मिळणे ही बाब खपवून घेतली जाणार नाही. रोहित्रांवरील विजेचा भार वाढून वीजपुरवठा खंडित होऊ नये, यासाठी अनधिकृत वीजजोडण्या तोडण्याची मोहीम हाती घ्यावी. दूध उत्पादक शेतकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी

(पान २ वर)

# महाराष्ट्रात विधान परिषदेच्या १७ जागांसाठी निवडणुका जाहीर

## १८ जूनला मतदान, २२ जूनला मतमोजणी

मुंबई ()-

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांतील विधान परिषदेच्या एकूण १७ जागांसाठी निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. या निवडणुकांमुळे महाराष्ट्रात आणखी १७ आमदारांची भर पडणार आहे. यामध्ये एका जागेसाठी पोटनिवडणूक देखील होणार आहे.

निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार, उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख १ जून आहे. त्यानंतर २ जून रोजी अर्जांची छाननी होणार असून, उमेदवारांना अर्ज माघारी घेण्यासाठी ४ जूनपर्यंत मुदत देण्यात आली आहे. प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया १८ जून रोजी पार पडणार असून, २२ जून रोजी मतमोजणी केली जाणार आहे.

विशेष म्हणजे, माजी आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांच्या रिक्त झालेल्या नागपूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघासाठीही पोटनिवडणूक जाहीर करण्यात आली आहे.

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका वेळेत न झाल्याने या मतदारसंघांतील निवडणूक प्रक्रिया रखडली होती. परिणामी, अनेक मतदारसंघांमध्ये आमदारांचा कार्यकाळ संपूनही जागा रिक्त राहिल्या होत्या. गेल्या अडीच वर्षांपासून काही जागा रिक्त असल्याने या निवडणुकांकडे राजकीय वर्तुळाचे विशेष लक्ष लागले आहे.

नियमांनुसार, स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील एकूण मतदारसंख्येच्या किमान ७५ टक्के मतदार उपलब्ध असल्यास विधान परिषदेची निवडणूक घेता येते. महाराष्ट्र विधान परिषदेच्या एकूण ७८ सदस्यांपैकी २२ सदस्य स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत निवडून येतात.

### निवडणूक वेळापत्रक

**अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख – १ जून**
**छाननी – २ जून**
**माघारीची अंतिम मुदत ४ जून**
**मतदान – १८ जून**
**मतमोजणी – २२ जून**



# संगमनेर पोलिसांचा मॉब डिस्पर्सल सराव

कायदा-सुव्यवस्थेसाठी सज्जता



संगमनेर
()-

शहरात साजरी होणारी बकरी ईद तसेच आगामी काळातील विविध सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास परिस्थिती प्रभावीपणे हाताळण्यासाठी संगमनेर पोलिसांनी रविवारी व्यापक जमाव विसर्जन सराव (मॉब डिस्पर्सल ड्रिल) आयोजित केला.

अहिल्यानगर जिल्हा पोलीस प्रशासनाच्या निर्देशानुसार, हा सराव आज दि. १८ मे २०२६ रोजी सकाळी ९.४५ ते १०.४५ या वेळेत संगमनेर येथील क्रीडा संकुलात पार पडला. अचानक उद्भवणाऱ्या दंगलसदृश्य किंवा कायदा-सुव्यवस्थेच्या परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी पोलीस यंत्रणेची सज्जता तपासणे आणि अधिक सक्षम करणे, हा या सरावाचा मुख्य उद्देश होता.

या सरावात संगमनेर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी, संगमनेर शहर पोलीस ठाणे, संगमनेर तालुका पोलीस ठाणे, घारगाव व आश्वी पोलीस ठाण्यांचे अधिकारी तसेच उपविभागातील पोलीस कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

सरावादरम्यान दंगलसदृश्य परिस्थिती निर्माण झाल्यास कोणती उपाययोजना करावी, जमावावर नियंत्रण कसे मिळवावे, परिस्थिती शांततेत कशी हाताळावी, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी पोलीस अधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी एसएलआर रायफल, डमी राउंड, हँड ग्रेनेड, अश्रुधूर सेल, लाठी, ढाल यांसह फायर फायटर आणि रुग्णवाहिकेचा वापर करून प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर केले.

हा जमाव विसर्जन सराव पोलीस अधीक्षक अहिल्यानगर, अपर पोलीस अधीक्षक श्रीरामपूर तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी संगमनेर यांच्या आदेश व मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडला. आगामी सणोत्सवांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस प्रशासन पूर्णपणे सज्ज असल्याचा संदेश या सरावातून देण्यात आला.


# 'नीट' मोटेगावकरला अटक

पुणे (प्रतिनिधी)-

नीट पेपरफुटीचे धागेदोरे आता जुळू लागले आहेत. या प्रकरणात आधी रसायनशास्त्राचे प्राध्यापक पी.व्ही. कुलकर्णी आणि नंतर वनस्पतिशास्त्र लेक्चरर मनीषा मांढरे यांना अटक करण्यात आली. आता नीट परीक्षा घेणाऱ्या नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) च्या अधिकाऱ्याचाही सहभाग असल्याचे समोर येत असतानाच आता मोठी माहिती समोर आली आहे. लातूरचे प्राध्यापक शिवराज मोटेगावकर यांना सीबीआयने अटक केल्याचे समोर आले आहे. शिवराज मोटेगावकर हे आरसीसी क्लासेसचे संचालक असून, आता त्यांची सीबीआयमार्फत चौकशी केली जाणार आहे.

(पान नं. ३ वर)






# संपादकीय...

## रुपयाला मोठा धक्का शंभरीकडे वाटचाल

भारतीय रुपयाच्या मूल्यात सातत्याने होत असलेली घसरण ही केवळ आर्थिक घडामोड नसून देशाच्या एकूण आर्थिक आरोग्याचा महत्त्वाचा संकेत मानला जातो. गेल्या काही महिन्यांपासून डॉलरच्या तुलनेत रुपया सातत्याने कमजोर होत आहे आणि आता तो ऐतिहासिक नीचांकी पातळीपर्यंत पोहोचल्याने उद्योग, व्यापार, गुंतवणूक, रोजगार आणि सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनावर त्याचे गंभीर परिणाम दिसू लागले आहेत. चलनाची किंमत घसरणे म्हणजे केवळ विदेशी चलन बाजारातील बदल नसतो, तर त्यामागे जागतिक अस्थिरता, आयात-निर्यात संतुलन, महागाई, परकीय गुंतवणूक आणि देशाच्या आर्थिक धोरणांची एकत्रित छाया असते. भारतातील परिस्थिती अधिक चिंताजनक यासाठी ठरते की, देश मोठ्या प्रमाणावर कच्चे तेल आयात करतो. आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किमती वाढल्या की त्याचा थेट परिणाम रुपयावर होतो. तेल खरेदीसाठी अधिक डॉलर खर्च करावे लागतात आणि त्यामुळे डॉलरची मागणी वाढते. परिणामी रुपयाची किंमत आणखी खाली जाते. हा दुष्टचक्राचा परिणाम संपूर्ण अर्थव्यवस्थेवर जाणवू लागतो. पेट्रोल, डिझेल, गॅस यांसारख्या इंधनांच्या किमती वाढतात आणि त्याचा परिणाम वाहतूक खर्चापासून शेती, उद्योग आणि किरकोळ बाजारापर्यंत सर्वच क्षेत्रांवर होतो. रुपयाच्या घसरणीचा सर्वाधिक फटका सामान्य नागरिकांना बसतो. इंधन महागले की जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढतात. भाजीपाला, धान्य, औषधे, बांधकाम साहित्य, इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि दैनंदिन वापराच्या अनेक वस्तू महाग होतात. महागाई वाढल्याने मध्यमवर्ग आणि गरीब कुटुंबांचे आर्थिक गणित कोलमडते. आधीच वाढत्या खर्चामुळे त्रस्त असलेल्या नागरिकांसाठी ही परिस्थिती आणखी कठीण बनते. पगार मर्यादित असताना खर्च मात्र सतत वाढत राहतो आणि त्यामुळे बचत कमी होऊ लागते. रुपयाची घसरण उद्योग क्षेत्रासाठीही मोठे आव्हान निर्माण करते. भारतातील अनेक उद्योग कच्चा माल, यंत्रसामग्री किंवा तांत्रिक उपकरणांसाठी आयातीवर अवलंबून आहेत. रुपया कमजोर झाल्याने आयात खर्च वाढतो. परिणामी उत्पादन खर्च वाढतो आणि उद्योगांना नफा टिकवणे कठीण जाते. काही उद्योग ग्राहकांवर वाढीव खर्च टाकतात, तर काहींना उत्पादन कमी करण्याचा निर्णय घ्यावा लागतो. याचा थेट परिणाम रोजगारावर होण्याची शक्यता असते. उत्पादन कमी झाले की नवीन भरती थांबते आणि काही ठिकाणी नोकरकपातीचे संकटही निर्माण होऊ शकते. विद्यार्थ्यांवर आणि परदेशात शिक्षण घेणाऱ्या कुटुंबांवरही रुपयाच्या घसरणीचा मोठा परिणाम होतो. डॉलरच्या तुलनेत रुपया कमजोर झाल्यामुळे परदेशी शिक्षणाचा खर्च वाढतो. फी, राहणीमान आणि इतर खर्चासाठी अधिक पैसे मोजावे लागतात. त्यामुळे अनेक कुटुंबांचे आर्थिक नियोजन विस्कळीत होते. तसेच परदेश प्रवास, वैद्यकीय उपचार आणि आयातित वस्तू खरेदी करणेही अधिक महाग बनते. रुपयाच्या घसरणीमागे जागतिक राजकीय अस्थिरतेचाही मोठा वाटा आहे. जगातील विविध भागांतील युद्धजन्य परिस्थिती, वाढते तणाव आणि तेल उत्पादक प्रदेशांमधील संघर्ष यामुळे आंतरराष्ट्रीय बाजार अस्थिर होतो. गुंतवणूकदार सुरक्षित गुंतवणुकीच्या शोधात अमेरिकन डॉलरकडे वळतात. त्यामुळे डॉलर मजबूत होतो आणि विकसनशील देशांच्या चलनांवर दबाव वाढतो. भारतासारख्या देशांना त्याचा अधिक फटका बसतो. याशिवाय परकीय गुंतवणुकीतील घट हीदेखील चिंतेची बाब आहे. परदेशी गुंतवणूकदारांना बाजारातील अनिश्चितता दिसू लागली की ते आपली गुंतवणूक काढून घेतात. त्यामुळे शेअर बाजारावर दबाव वाढतो आणि चलन बाजारातही अस्थिरता निर्माण होते. रुपयाच्या सातत्याने होणाऱ्या घसरणीमुळे विदेशी गुंतवणूकदारांचा विश्वास कमी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. अर्थव्यवस्थेतील ही परिस्थिती केवळ आकड्यांपुरती मर्यादित नाही, तर ती देशातील प्रत्येक नागरिकाच्या दैनंदिन जीवनाशी जोडलेली आहे.


युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

पाहिजेत

अकाऊंटंट | जागा ०२

टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे

आकर्षक पगार व इतर सुविधा

बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com




वाटचाल तीन दशकांची


# उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. १ अहिल्यानगर यांचे कार्यालय

**भूमिसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेच हक्क अधिनियम २०१३ चे कलम ११ खालील प्राथमिक अधिसूचना**

## अधिसूचना

**क्रमांक: भूसं/मौजे सुपेकरवाडी, ता. कर्जत/एसआर ७/२०१८**

ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क. संकिर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश उक्त अधिसुचना असा करण्यात आला आहे) याव्दारे असे अधिसुचीत केले आहे की, उक्त अधिनियमांच्या कलम ३ च्या खंड (झेड ओ) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखादया जिल्हयातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल :

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, अहिल्यानगर जिल्हयाच्या जिल्हाधिका-यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश उक्त जमीन असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यापुढे ज्याचा निर्देश उक्त सार्वजनिक प्रयोजन असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदींन्वये याव्दारे असे अधिसुचीत करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत. आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चार मध्ये दिलेला आहे. आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोटकलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाच मध्ये दिलेला आहे. त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल. परंतू आणखी असे की जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्कर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही. तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अनुसार जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उपनियम (३) व्दारे विहित केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे. आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्य पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. १ अहिल्यानगर यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची – एक**
**जमीनीचे वर्णन**

| अ. क्र. | गट नंबर | आवश्यक जमिनीचे अदमासे क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|
| १ | ११/१ ते ११/७ | ०.६० |
| २ | १०/१ | ०.३२ |
| ३ | ३०० | ०.०२ |
| ४ | १७/१ व १७/२ | ०.०२ |
| ५ | ८ | ०.५५ |
| ६ | ९ | ०.०२ |
| ७ | ३०५/१ ते ३०५/३ | ०.२१ |
| ८ | ३१०/१ | ०.०६ |
| ९ | ३१०/२ | ०.०४ |
| १० | ३१०/३ | ०.०४ |
| ११ | ३०९ | ०.०७ |
| १२ | ३०८ | ०.१२ |
| १३ | ३२१/१ व ३२१/२ | ०.०६ |
| १४ | ३१९ | ०.१५ |
| १५ | ३२० | ०.०६ |
| १६ | ३२२ | ०.२८ |

| अ. क्र. | गट नंबर | आवश्यक जमिनीचे अदमासे क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|
| १७ | २८१/१ | ०.०६ |
| १८ | २८१/२ | ०.०६ |
| १९ | २८१/३ | ०.०५ |
| २० | २८१/४ | ०.०४ |
| २१ | २८४/१ ते २८४/३ | ०.२५ |
| २२ | २८२ | ०.१२ |
| २३ | ३२३ | ०.४३ |
| २४ | २८५/१ | ०.०४ |
| २५ | २८५/२ | ०.०२ |
| २६ | २९७ | ०.०१ |
| २७ | २८७/१ | ०.०९ |
| २८ | २८७/२ | ०.०५ |
| २९ | २८७/३ | ०.०१ |
| ३० | ३०७ | ०.०८ |
| ३१ | ३०६ | ०.१३ |
| | **एकूण** | **४.०६** |

**अनुसूची– दोन**
**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नांव :–** मौजे सुपेकरवाडी ता. कर्जत जिल्हा अहिल्यानगर येचील कुकडी डावा कालवा चिलवडी शाखा वितरिका १५ ची डावी चारी क्र.२ चे करीता भुसंपादन प्रस्ताव क्रमांक ७/२०१८

**प्रकल्प कार्याचे वर्णन :–** मौजे सुपेकरवाडी ता. कर्जत जिल्हा अहिल्यानगर येचील कुकडी डावा कालवा चिलवडी शाखा वितरिका १५ ची डावी चारी क्र.२ चे करीता भुसंपादन प्रस्ताव क्रमांक ७/२०१८

**समाजाला मिळणारे लाभ:** मौजे सुपेकरवाडी ता. कर्जत जिल्हा अहिल्यानगर येथील कुकडी डावा कालवा चिलवडी शाखा वितरिका १५ ची डावी चारी क्र.२ चे अंतर्गत येणाऱ्या गांवातील जमीनीला व पिण्यासाठी पाणीपुरवठा. (आर्थिक, रोजगार, पायाभूत सुविधा, सोयीसुविधा याबाबत व इतर लाभासंबंधात)

**अनुसूची– तीन**

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :** लागु नाही

**अनुसूची– चार**

**(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश.**

प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र शासनाकडील क्र. संकीर्ण २०११/प्र.क्र.७/अ-३, दि.२१/०१/२०२० नुसार भुसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाईचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ प्रकरण दोनच्या व प्रकरण तीनच्या तरतुदी लागू करण्यापासुन सुट देणेल आलेली आहे.

**अनुसूची – पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल:–**

अ. प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम लागु नाही. ब. प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता लागु नाही. क. ज्या अधिसूचनेव्दारे प्रशासकाची नियुक्त करण्यात आली आहे. त्या अधिसुचनेचा तपशिल लागु नाही.

टिप-उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी भुसंपादन क्र. १, जिल्हाधिकारी कार्यालय अहिल्यानगर यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

**दिनांक : / /२०२६**
**ठिकाण: अहिल्यानगर**

जिमाका/नगर/जाहि/२४/२०२६

**अतुल चोरमारे**
**उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्र. १**
**अहिल्यानगर**

# पाणीटंचाई निवारणास...

पान नं. ०१ वरून- पाणी उपशाच्या मोटारी सुरू करण्याबाबत वेळेचे योग्य नियोजन करावे. वादळामुळे पडलेले विजेचे खांब उभारण्याचे काम इतर भागातील मनुष्यबळ वळवून तत्काळ पूर्ण करावे, अशा सूचनाही पालकमंत्र्यांनी दिल्या.

जिल्हा परिषदेच्या जलजीवन मिशन व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांतर्गत मंजूर असलेल्या पाणीपुरवठा योजनांची कामे विनाविलंब पूर्ण करावीत. कामे परस्पर उपकंत्राटदारांना देणाऱ्या मुख्य ठेकेदारांवर कडक प्रशासकीय कारवाई करावी. अनधिकृत जलवाहिन्यांद्वारे होणारी पाणीचोरी रोखण्यासाठी दंडात्मक पावले उचलावीत. जलजीवन मिशनमधील गैरव्यवहार व त्रुटी दूर करण्यासाठी स्वतंत्र कारवाई केली जाणार आहे. ज्या ठिकाणी पाण्याचे स्रोत नसतानाही केवळ जलवाहिन्या टाकण्यात आल्या आहेत, तेथील त्रुटींबाबत नागरिकांनी किमान पन्नास सह्यांचे निवेदन लोकप्रतिनिधींकडे जमा करावे. तसेच, पाणी उचलताना ते शुद्ध करूनच टँकरमध्ये भरावे व गढूळ पाणी येत असलेल्या ठिकाणी पाणी शुद्धीकरणासाठी टीसीएल भुकटीचा वापर करावा. कालव्यातून पिण्यासाठी स्वतंत्र जलवाहिनी संगमनेरपर्यंत आणण्याबाबत व तळेगाव साठवण तलावापर्यंत जलवाहिनी नेण्याबाबत सर्वेक्षण करण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले. नागरिकांना स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून जलशुद्धीकरण यंत्रणा बसविण्याचे नियोजन आहे. सर्व शासकीय अधिकारी, ग्रामसेवक व तलाठी यांनी आपापल्या मुख्यालयात उपस्थित राहणे सक्तीचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पाणीटंचाईच्या काळात ग्रामसेवकांनी मुख्यालयात थांबून नागरिकांच्या समस्या सोडविण्यावर भर द्यावा. बैठकीस अनुपस्थित राहणाऱ्या, कर्तव्यात कसूर करणाऱ्या व केवळ कागदोपत्री काम करणाऱ्या ग्रामसेवकांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांच्यावर कठोर प्रशासकीय कारवाई करावी, असेही त्यांनी सांगितले. कार्यकर्त्यांनी राजकीय मतभेद बाजूला ठेवून केवळ विकासावर लक्ष केंद्रित करावे.


**पाहिजेत**
आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.
हेल्पर - ०१
संपर्क- नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090


**जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय,**
**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, अहिल्यानगर**
पत्ता:- सुरभी हॉस्पिटल जवळ कविजंग लॉन्सच्या शेजारी अहिल्यानगर- छत्रपती संभाजीनगर हायवे अहिल्यानगर-४१४००३
website: www.mahawakf.com Email:- dwoahilyanagarmahawakf.com

संचिका क्र. ADR/२९३ क्र. वक्फ/अहिल्यानगर/चौकशी ०८/२०२६ दिनांक १५ मे २०२६

**(जाहिर प्रगटन)**

उम्मीद अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरीता योजना मंजूर करणेबाबत.

**वक्फ संस्थेच नाव व पत्ता:–** Naikwadpura Masjid At. Sangamner, Tq. Sangamner Dist. Ahilyanagar

उपरोक्त वक्फ संस्था महाराष्ट्र राज्य मंडळात क्र. MSBW/ADR/६९०/२०२४ अन्वये नोंदणीकृत असुन अर्जदार इम्तियाझओद्दिन शमशोद्दीन शेख व इतर यांनी दि. ०५/०५/२०२६ रोजीच्या अर्जान्वये सदर संस्थेच्या व्यवस्थापनाकरीता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे प्रारुप योजना दाखल केलेली आहे. प्रारुप योजनेतील तरतूदीनुसार विश्वस्तांचा कार्यकाळ ५ वर्षांचा असून व्यवस्थापन समिती निवडीची रित उर्वरित व्यवस्थापकीय समिती सदस्यांच्या बहुमताने नवीन सदस्यांची नियुक्ती करतील. योजनेमध्ये नमूद प्रस्तावित व्यवस्थापन समिती खालीलप्रमाणे आहे:-

| अ. क्र. | नाव | पद | अ. क्र. | नाव | पद |
|---|---|---|---|---|---|
| १. | इम्तियाझओद्दीन शमशोद्दीन शेख | अध्यक्ष | ६. | शाबीर शेर मोहम्मद शेख | सदस्य |
| २. | जाबीरखान नजीरखान पठान | उपाध्यक्ष | ७. | मुबीनखान मुश्ताकखान पठान | सदस्य |
| ३. | कय्युम दाउद शेख | सचिव | ८. | सलीम युनूस शेख | सदस्य |
| ४. | रईसखान बशीरखान पठान | खजिनदार | | | |
| ५. | उमरफारुक नुरमोहम्मद शेख | सदस्य | ९ | मुजाहिद सुलेमान शेख | सदस्य |

सदर प्रारुप योजनेबाबत काही तक्रारी, आक्षेप असल्यस संबंधितांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत, जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर, पत्ता-सुरभी हॉस्पिटल जवळ कविजंग लॉन्सच्या शेजारी अहिल्यानगर- छत्रपती संभाजीनगर हायवे अहिल्यानगर ४१४००३ येथे आपले म्हणणे दाखल करावे. विहीत वेळेनंतर आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही. याची दक्षता घ्यावी.

**(इम्रान महमुद शेख),**
**जिल्हा वक्फ अधिकारी अहिल्यानगर**


We treat He cure's
**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

**जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी**

**त्वरित पाहिजेत**
पेट्रोल पंप वर २ कर्मचाऱ्यांची पदभरती करायची असून, इच्छुक उमेदवारांनी संपर्क करावा
पत्ता - चैतन्य पेट्रोलियम, संगमनेर बायपास पुणे - नाशिक हायवे, घुलेवाडी
8888808397

**पाहिजेत**
पुरुष रिसेप्शनिस्ट
अनुभवास प्राधान्य, बँकिंग व्यवहाराचे ज्ञान, संगणकाचे ज्ञान व स्वत:ची दुचाकी व लायसन्स आवश्यक
संपर्क – नविन नगर रोड, संगमनेर
8378956909
8459199913

**पाहिजेत**
अकाऊंटस् व ऑडिटच्या कामासाठी हुशार व होतकरू मुले पाहिजेत
जितेंद्र लाहोटी (चार्टर्ड अकाऊंटंट)
मेनरोड, काळभैरवनाथ मंदिरा शेजारी, संगमनेर
9822523424

**पाहिजेत**
स्वयंपाकीन – ०१ (२ व्यक्तींचा स्वयंपाक)
ड्रायव्हर – ०१
क्लार्क – ०१ (लेडीज/जेन्ट्स)
वॉचमन – ०१
अनुभवास प्राधान्य
9822334431

**पाहिजेत**
पसायदान चिल्ड्रन क्लिनिक अॅण्ड नर्सिंग होम
ताजणे मळा, नविन नगर रोड, संगमनेर
डॉक्टर – BAMS / BHMS (सकाळ–१, रात्री –१)
नर्स – ANM / GNM (सकाळी –१, दुपारी–१, रात्री –२)
लॅब टेक्निशिअन (सकाळी –१, रात्री –१)
९९६०६१०६२३

**ड्रायव्हर पाहिजे**
ऑटोमॅटिक गाडीसाठी ०१ जागा
मॅन्युअल गेअर गाडीसाठी ०१ जागा
निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे
8668269897

**गाळे भाडेतत्वावर देणे आहे**
शोरुम, ऑफीस, बँक किंवा कमर्शिअल वापरासाठी दोन गाळे भाडे तत्वावर देणे आहे
ग्राऊंड फ्लोअर – १७०० स्क्वे. फुट
फर्स्ट फ्लोअर – १७०० स्क्वे. फुट
पत्ता – नाशिक–पुणे हायवे, डेंटल कॉलेज समोर, घुलेवाडी, ता. संगमनेर
संपर्क - 7755965616, 9422737484

**त्वरित पाहिजेत**
ड्रायव्हर तसेच ऑफिस काम व साईट व्हिजिटसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
9421911671

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक ९३२५०२८६८६



दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४


वाचकांसाठी निवेदन– सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी







संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार
व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०


आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०




## बाळासाहेबांच्या जन्मशताब्दीनिमित्त व्यंगचित्रांची मेजवानी; शिवसेनेच्या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

हिंदूहृदयसम्राट, शिवसेनाप्रमुख तथा जागतिक कीर्तीचे व्यंगचित्रकार बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त संगमनेर शहर शिवसेना (उबाठा) वतीने आयोजित करण्यात आलेली भव्य व्यंगचित्रकला स्पर्धा मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडली. या अनोख्या उपक्रमाला विद्यार्थी, शिक्षक, पत्रकार तसेच हौशी व्यंगचित्रकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी जिल्हाप्रमुख सचिन कोते पाटील यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, व्यंगचित्र हे केवळ कला नसून समाजातील प्रश्नांना वाचा फोडणारे प्रभावी माध्यम आहे. शेतकरी, महागाई, बेरोजगारी आणि भ्रष्टाचार यांसारख्या विषयांवर व्यंगचित्रातून प्रभावीपणे भाष्य करता येते. विधानसभा संपर्कप्रमुख सूर्यकांत शिंदे यांनी स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांचे कौतुक करत, या उत्कृष्ट व्यंगचित्रांना 'सामना'मध्ये प्रसिद्ध करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे सांगितले.

उपजिल्हाप्रमुख अमर कतारी यांनी सांगितले की, बाळासाहेब ठाकरे हे केवळ प्रभावी राजकीय नेते नव्हते, तर त्यांच्या व्यंगचित्रांनी समाजमनावर कायमचा ठसा उमटवला होता. त्यांच्या व्यंगचित्रांमधून सामाजिक आणि राजकीय परिस्थितीवर मार्मिक भाष्य केले जात असे. त्यांच्या कलात्मक वारशाला अभिवादन करण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धा 'विद्यार्थी गट' आणि 'खुला गट' अशा दोन विभागांत पार पडली. स्पर्धकांनी आपल्या कुंचल्यातून सामाजिक, राजकीय आणि समकालीन विषयांवर प्रभावी चित्रण साकारले. वाढती महागाई, इंधन दरवाढ आणि केंद्र व राज्य शासनाच्या धोरणांवर आधारित व्यंगचित्रांनी विशेष लक्ष वेधून घेतले.

स्पर्धेदरम्यान उत्कृष्ट कलाकृतींचे आकर्षक प्रदर्शनही भरविण्यात आले होते. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कलाकारांच्या कलाकृतींचे कौतुक केले. विजेत्यांना रोख पारितोषिक आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी जिल्हाप्रमुख सचिन कोते पाटील, जगदीश चौधरी, सूर्यकांत शिंदे, शहरप्रमुख अमित चव्हाण, फैसल सय्यद यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, पालक, विद्यार्थी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्पर्धेसाठी पारखे सर आणि सोमवंशी सर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. यावेळी, त्यांनी ही स्पर्धा दरवर्षी आयोजित करण्याची विनंतीही संगमनेर शिवसेनेला केली.

# तरुणांना झुरळ म्हणणारे वक्तव्य दुर्दैवी

## न्या. सूर्यकांत यांना छात्रभारतीकडून २०० पत्रे पाठविणार

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

देशातील तरुणांच्या प्रश्नांना झुरळांशी तुलना करणारे वक्तव्य अत्यंत दुर्दैवी आणि लोकशाही मूल्यांना धक्का देणारे असल्याची टीका छात्रभारतीचे राज्याध्यक्ष अनिकेत घुले यांनी केली आहे. या पार्श्वभूमीवर छात्रभारतीच्या वतीने मा. न्यायमूर्ती सूर्यकांत यांना राज्यभरातून २०० पत्रे पाठविण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

अनिकेत घुले यांनी न्यायमूर्ती सूर्यकांत यांना पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे की, भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला व्यवस्थेला प्रश्न विचारण्याचा मूलभूत अधिकार दिला आहे. मात्र, व्यवस्थेला प्रश्न विचारणाऱ्या तरुणांची तुलना झुरळांशी करणे योग्य नाही. देशातील बेरोजगारी, शिक्षण व्यवस्थेतील ढासळलेली स्थिती, स्पर्धा परीक्षांचे वारंवार होणारे पेपर फुटीचे प्रकार, विद्यार्थ्यांवर होणारे लाठीमार, वाढत्या आत्महत्या यांसारख्या गंभीर प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी तरुण आवाज उठवत आहेत.

पत्रात पुढे म्हटले आहे की, नीटसारख्या परीक्षांमध्ये झालेल्या गैरप्रकारांमुळे लाखो विद्यार्थ्यांचे नुकसान झाले आहे. अनेक सरकारी पदे रिक्त असूनही भरती प्रक्रिया रखडलेली आहे. अशा परिस्थितीत तरुण प्रश्न विचारत असतील, तर त्यांना दोष देण्याऐवजी त्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्याची भूमिका न्यायव्यवस्थेने घ्यावी.

तसेच, माहिती अधिकार (आरटीआय) कायद्याच्या माध्यमातून अनेक भ्रष्टाचार प्रकरणे समोर आली आहेत. लोकशाही व्यवस्थेत सरकारच्या कामकाजावर लळींळशपी चा प्रभाव आणि पारदर्शकता आवश्यक आहे. व्यवस्थेविरोधात प्रश्न विचारणे हा गुन्हा नसून, तो संविधानाने दिलेला अधिकार असल्याचे घुले यांनी स्पष्ट केले.

छात्रभारतीने न्यायव्यवस्थेने अशा संवेदनशील विषयांवर अधिक जबाबदारीने भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली असून, देशभरातील तरुणांचे प्रश्न आणि भावना समजून घेण्याचे आवाहनही केले आहे.

## आश्वी खुर्दच्या वाड्या - वस्त्यांवर राजहंस संघाकडून पाणीपुरवठा

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

संगमनेर तालुक्यात अचानक आलेल्या मान्सूनपूर्व वादळी वाऱ्याने आणि पावसाने आश्वी खुर्द परिसराला मोठा तडाखा दिला. या नैसर्गिक आपत्तीत अनेक ठिकाणी महाकाय झाडे आणि विजेचे खांब उन्मळून पडल्याने संपूर्ण परिसराचा वीज पुरवठा खंडित झाला होता. वीज नसल्याने गावातील पाणी उपसा यंत्रणा आणि जलवाहिन्या ठप्प झाल्या, परिणामी ऐन उन्हाळयात नागरिकांसह जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. त्यामुळे कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी तातडीने संकटकाळात आश्वी ग्रामस्थांना मदतीच्या सूचना दिल्या.

विजेअभावी पाणी टंचाई निर्माण झाल्याची माहिती गावातील शेतकरी विकास मंडळाच्या कार्यकर्त्यांनी बाळासाहेब थोरात यांना कळवली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून बाळासाहेब थोरात आणि डॉ.जयश्रीताई थोरात यांनी तातडीने 'राजहंस दूध संघा'तील अधिकाऱ्यांना आश्वी खुर्दमध्ये पाण्याचे टॅंकर पाठवण्याच्या सूचना दिल्या.



गुरुवार, शुक्रवार आणि शनिवार असे सलग तीन दिवस गावातील ज्या भागात पाण्याची गरज आहे. अशा सर्व वाड्या आणि वस्त्यांवर राजहंस दूध संघाच्या टॅंकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. जोपर्यंत सर्वकाही पुर्ववत होत नाही. तोपर्यंत पाणीपुरवठ्यासह इतर मदत देण्याची ग्वाही ग्रामस्थांना थोरात यांनी दिली आहे.

दरम्यान, प्रत्येक कुटुंबाला आणि गरजू वस्तीला पुरेसे पाणी मिळावे यासाठी शेतकरी विकास मंडळाचे ज्येष्ठ आणि तरुण कार्यकर्ते भर उन्हात आणि रात्री विशेष परिश्रम घेत आहेत. आपत्तीच्या काळात कार्यकर्त्यांनी दाखवलेली संवेदनशीलता आणि नियोजन यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त करत बाळासाहेब थोरात यांचे आभार मानले आहेत.

## तळेगाव दिघे व पारेगाव खुर्द येथे महावितरणच्या सौर ऊर्जा प्रकल्पांचे लोकार्पण

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

शेतकऱ्यांना दिवसा बारा तास वीज देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून, त्या निर्णयाची अंमलबजावणी सौर ऊर्जा प्रकल्पांच्या माध्यमातून सुरू झाली आहे. यासोबतच, दमणगंगा-वैतरणा-गोदावरी प्रकल्पाचे पाणी थेट तळेगाव परिसरापर्यंत आणून या भागातील पाणीप्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यावर शासनाचा भर आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यासह स्थानिक पातळीवर रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होतील, असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले. संगमनेर तालुक्यातील तळेगाव दिघे येथे महावितरणच्या पाच मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पाचा लोकार्पण सोहळा, तसेच पारेगाव खुर्द येथील पाच मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पाचे भूमिपूजन डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी आमदार अमोल खताळ, महावितरणचे कार्यकारी अभियंता प्रदीप वट्टमवार, स्थानिक पदाधिकारी, विविध विभागांचे अधिकारी, सरपंच आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



डॉ. विखे पाटील म्हणाले, सध्या पाणीस्थिती अत्यंत गंभीर आहे. प्रशासनाच्या वतीने पाण्याचे नियोजनबद्ध वितरण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. तळेगावपर्यंत पाणी आणण्यासाठी वैजापूर चारीच्या विस्तारीकरणाचे काम हाती घेण्यात आले असून, त्यासाठी ४२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यामुळे तळेगाव परिसरातील शेतीला मोठा दिलासा मिळणार आहे. सिन्नर तालुक्यासाठी तयार करण्यात आलेल्या १२ हजार कोटी रुपयांच्या दमणगंगा-वैतरणा-गोदावरी प्रकल्पात आता संगमनेर तालुक्यातील भोजापूर प्रकल्पाचा समावेश करण्यात आला आहे. या प्रकल्पाचे पाणी तळेगाव परिसरातील खालच्या पट्ट्यापर्यंत आणण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रस्तावास सकारात्मक प्रतिसाद दिला असून, यामुळे या दुष्काळी भागाला मोठा दिलासा मिळणार असल्याचे डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.

जिल्ह्यात नव्या उद्योगांसाठी गुंतवणूकदार उत्सुक असून जमिनीची मागणी वाढत आहे. शिर्डी येथे लवकरच एका मोठ्या उत्पादन प्रकल्पाचे उद्घाटन होणार असून, त्यातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होणार आहे. तरुणांनी केवळ पदवीवर अवलंबून न राहता तांत्रिक कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. भविष्यातील रोजगाराच्या संधी लक्षात घेऊन जिल्ह्यात रतन टाटा कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. या माध्यमातून तरुणांना आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण मिळेल आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. अशा प्रकल्पांमुळे आगामी पिढीचे भविष्य उज्ज्वल होणार असल्याने युवकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. विखे पाटील यांनी केले.

आमदार अमोल खताळ म्हणाले, या नवीन सौर ऊर्जा प्रकल्पांमुळे भागवतवाडी, वामनवाडी, जुने गाव आणि काकडवाडी परिसरातील सुमारे ९०० शेतकऱ्यांना सकाळी नऊ ते सायंकाळी पाच या वेळेत पूर्ण दाबाने त्रि-फेज वीजपुरवठा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा मिळण्याची दीर्घकालीन मागणी पूर्ण झाली आहे. तसेच, वन्य प्राण्यांच्या भीतीमुळे रात्री शेतीला पाणी देण्याचा त्रासही कमी होणार आहे.

निळवंडे धरणाच्या माध्यमातून गायत्री खदानीत पाणी सोडून तळेगाव परिसरातील पाणीटंचाई दूर करण्यात आली आहे. पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांच्या पुढाकारामुळे दमणगंगा-वैतरणासारख्या महत्त्वपूर्ण प्रकल्पात संगमनेर तालुक्यातील गावांचा समावेश झाला आहे. तसेच, बिरोबा देवस्थानच्या विकासासाठी पाच कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा अजित पवार यांच्या सहकार्यामुळे या परिसराचा झपाट्याने विकास होत असल्याचे आमदार खताळ यांनी नमूद केले.

## सेवानिवृत्त शिक्षकाचा ट्रकच्या धडकेत दुर्दैवी मृत्यू

संगमनेर (प्रतिनिधी)-



संगमनेर शहरातील संगमनेर-नाशिक महामार्गावरील गणेशनगरकडे जाणाऱ्या रस्त्यावर भरधाव आयशर गाडीच्या धडकेत एका सेवानिवृत्त शिक्षकाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुधाकर तुकाराम भालेराव (वय ७०, रा. माउली कॉलनी, संगमनेर कॉलेजच्या पाठीमागे) हे दि. १७ मे २०२६ रोजी सकाळच्या सुमारास त्यांच्या स्कुटी (क्र. एमएच १७ बी डब्ल्यू ९८९५) वरून गणेशनगरकडे जात होते. त्यावेळी संगमनेर-नाशिक रोडलगत आयसीआयसी बँकेसमोर पाठीमागून येणाऱ्या आयशर गाडी (क्र. एमएच ४२ ए क्यू ८००४) चालकाने रस्त्यावरील परिस्थितीकडे दुर्लक्ष करून निष्काळजीपणे वाहन चालवत त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.

या भीषण धडकेत सुधाकर भालेराव गंभीर जखमी झाले. अपघातानंतर त्यांना तातडीने घुलेवाडी येथील सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. घटनास्थळी असलेल्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये आयशर चालकाने निष्काळजीपणे वाहन चालवत दुचाकीला धडक दिल्याचे स्पष्ट झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला होता. त्यानंतर अंत्यसंस्कारासाठी मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.

याप्रकरणी शरद पोपट भालेराव (रा. डिग्रस, ता. संगमनेर) यांनी आयशर चालकाविरोधात तक्रार दाखल केली असून पुढील तपास पोलीस करीत आहेत. दरम्यान, सुधाकर भालेराव यांच्यावर त्यांच्या मूळगाव डिग्रस येथील भालेराव वस्तीवर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी श्रद्धांजली अर्पण करत दुःख व्यक्त केले.

## मोटेगावकरला अटक...

पान नं. १ वरुन-

याबाबत अधिकची माहिती अशी की, नीट पेपरफुटी प्रकरण केवळ राज्यापुरतेच मर्यादित न राहता देशभरातील मोठे रॅकेट असल्याचे समोर आले आहे. यात अनेकांना ताब्यात घेण्यात आले आहे. विशेष म्हणजे, यात प्राध्यापकांचादेखील समावेश आहे. यापूर्वी दोन प्राध्यापकांना सीबीआयने अटक केली होती. आता शिवराज मोटेगावकर यांना देखील अटक करण्यात आली आहे. कारण, मोटेगावकर यांचे राज्यभरात नीट परीक्षेसंदर्भात मोठे क्लासेस आहेत. गेल्याच आठवड्यात मोटेगावकर यांचे ज्या ज्या ठिकाणी क्लासेस आहेत, त्या ठिकाणी छापेमारी केली होती. यावेळी काही महत्त्वाची कागदपत्रे आणि काही इलेक्ट्रॉनिक गॅझेटदेखील सीबीआयने ताब्यात घेतली होती.

त्यानंतर आज शिवराज मोटेगावकर यांना सीबीआयने अटक केली असून, त्यांना सीबीआयच्या विशेष न्यायालयात हजर केले जाईल. त्यानंतर या संपूर्ण रॅकेटमध्ये मोटेगावकरांचा काय संबंध आहे, हे समोर येणार आहे. तसेच, जे प्रमुख आरोपी आहेत, लातूरचे पी.व्ही. कुलकर्णी, पुण्यातल्या मनीषा मांढरे यांनादेखील अटक करण्यात आलेली आहे. त्यामुळे आता या सर्वांचा एकमेकांशी काही संबंध आहे का, याचा तपास सीबीआयकडून करण्यात येत आहे.

चौकशीतून समोर आलेल्या माहितीनुसार, देशभरात ३ मे रोजी नीटची परीक्षा होती. परीक्षेच्या १० दिवस आधीच, म्हणजे २३ एप्रिल रोजीच शिवराज मोटेगावकरने नीटची प्रश्नपत्रिका मिळवली होती. चौकशीत मोटेगावकरच्या मोबाइलमध्येच नीटची प्रश्नपत्रिका आणि उत्तरपत्रिका मिळाल्याचे समोर आले आहे. शिवराज मोटेगावकरने विवेक पाटील नावाच्या एका व्यक्तीला तसेच विद्यार्थ्यांना नीटची प्रश्नपत्रिका पाठवली होती. मात्र, तपास यंत्रणेसमोर तो सध्या लाभार्थी विद्यार्थ्यांची नावे सांगण्यास टाळाटाळ करत आहे. इतकेच नव्हे तर, स्वतःचा बचाव करण्यासाठी त्याने परीक्षा संपल्यानंतर या प्रश्नपत्रिकेचे सर्व तांत्रिक पुरावे देखील नष्ट केले असल्याचे तपासात समोर आले आहे.

## पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक न झाल्याने महायुती पदाधिकारी नाराज

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत महायुतीच्या पदाधिकाऱ्यांची बैठक होणार असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात अशी कोणतीही बैठक झाली नसल्याने काही पदाधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली.

मालपाणी लॉन्स येथे पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत तालुक्यातील टंचाई परिस्थितीवर आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यानंतर महायुतीच्या पदाधिकाऱ्यांची स्वतंत्र बैठक होणार असल्याचे सांगून संबंधितांना संपर्क कार्यालयातून उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले होते.

मात्र आढावा बैठक संपल्यानंतर पालकमंत्री तेथून निघून गेले आणि त्यांना अशा बैठकीबाबत माहिती नसल्याचे समोर आले. त्यामुळे काही पदाधिकाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले.

बैठकीत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पदाधिकाऱ्यांना विकासकामांवर भर देण्याचे आवाहन केले. जिरवा-जिरवीचे राजकारण थांबवून विकासावर लक्ष केंद्रित करा, असे त्यांनी सांगितले.

दरम्यान, या प्रकरणावर महायुतीच्या काही पदाधिकाऱ्यांनी उघड प्रतिक्रिया देण्यास टाळले.

## अकोले तालुक्यात चोरट्यांचा धुमाकूळ

### जबरी चोरी आणि घरफोडीत तब्बल चार लाखांहून अधिकचा ऐवज लंपास

अकोले (युवावार्ता प्रतिनिधी)-

अकोले तालुक्यात चोरट्यांचा धुमाकूळ; जबरी चोरी आणि घरफोडीत तब्बल चार लाखांहून अधिकांचा ऐवज लंपास

अकोले : अकोले पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोरट्यांनी अक्षरशः धुमाकूळ घातला असून जबरी चोरी व घरफोडीच्या दोन वेगवेगळ्या घटनांमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनांमध्ये सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम असा तब्बल चार लाखांहून अधिक रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला आहे. या वाढत्या चोरीच्या घटनांमुळे पोलिसांच्या रात्रगस्तीवर नागरिकांकडून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

पहिली धक्कादायक घटना अकोले तालुक्यातील औरंगपूर येथे घडली. फिर्यादी अशोक केरू वाळुंज यांच्या राहत्या घरात चार अज्ञात चोरट्यांनी मध्यरात्री प्रवेश करून जबरी चोरी केली. चोरट्यांनी फिर्यादी यांच्या पत्नीच्या गळ्यातील सोन्याचे दागिने जबरदस्तीने हिसकावून घेतले. त्यानंतर घरातील कपाट फोडून त्यामधील सोन्या-चांदीचे दागिने तसेच रोख रक्कम चोरून नेली. या घटनेत सुमारे दोन लाख रुपयांचा मुद्देमाल लंपास करण्यात आला आहे.

दुसरी घटना धुमाळवाडी येथे घडली असून येथे अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करत मोठा ऐवज चोरून नेला. फिर्यादी रामनाथ गणपत निमसे (रा. अंबिका नगर, निमसे वस्ती, धुमाळवाडी, ता. अकोले) यांच्या राहत्या घराचे किचनचे दार उचकटून चोरट्यांनी घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील कपाटात ठेवलेली रोख रक्कम तसेच सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेण्यात आले. या घरफोडीत तब्बल २ लाख ११ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेला आहे.

अकोले पोलीस ठाण्याच्या हद्दीत सातत्याने वाढत असलेल्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी पोलीस गस्त अधिक प्रभावी करण्याची मागणी नागरिकांकडून होत असून, चोरट्यांचा तातडीने बंदोबस्त करावा अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

ताम्हाणे हॉस्पिटल
पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ ?
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
आजच संपर्क करा ! 7219100100

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



भंडारी
"शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी"
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेझर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर साडीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# लग्नात 'फेट्या'ऐवजी 'पुस्तकांचा' मान

## गिते आणि आंधळे परिवाराची ७०० पाहुण्यांना विचारांची शिदोरी



संगमनेर ()- लग्नसमारंभ म्हटलं की डोळ्यांसमोर येतात ते पाहुण्यांच्या स्वागतासाठी बांधले जाणारे फेटे, पाहुण्यांच्या नावाचा बडेजाव आणि स्टेजवर होणारी गर्दी. मात्र, या रूढ झालेल्या समीकरणाला छेद देत, सोनोशी (ता. संगमनेर) येथील गिते आणि खंबाळे (ता. सिन्नर) येथील आंधळे परिवाराने आपल्या पाल्यांच्या विवाहात 'पुस्तक वाटप' करून समाजात एक नवा पायंडा पाडला आहे. 'फेट्याचा मान' बाजूला सारून पाहुण्यांना 'ज्ञानाची भेट' देणाऱ्या या उपक्रमाचे सध्या सर्वत्र कौतुक होत आहे.

सोनोशी येथील प्रगतशील शेतकरी भाऊसाहेब गिते यांचे चिरंजीव बाळासाहेब आणि अनिल आंधळे यांची कन्या शुभांगी यांचा विवाह सोहळा नुकताच नांदूर शिंगोटे येथे पार पडला. या मंगल प्रसंगी उपस्थित ७०० हून अधिक पाहुण्यांना फेटे बांधण्याऐवजी वैचारिक व प्रेरणादायी पुस्तके देण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने महात्मा गांधींचे 'सत्याचे प्रयोग', उत्तम कांबळे यांचे 'आई समजून घेताना', कॉ. गोविंद पानसरे यांचे 'शिवाजी कोण होता?', अच्युत गोडबोले यांचे 'किमयागार' आणि अरविंद जगताप यांच्या 'पत्रास कारण की' यांसारख्या प्रसिद्ध पुस्तकांचा समावेश होता.

गिते परिवाराने सामाजिक भान जपण्याची ही पहिलीच वेळ नाही. तीन वर्षांपूर्वी एका कौटुंबिक लग्नात त्यांनी ११११ केशर आंब्यांच्या रोपांचे वाटप करून पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला होता. त्याच प्रेरणेतून, यावेळेस समाजाची वैचारिक भूक भागवण्यासाठी 'पुस्तके वाटण्याचा' महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले.

हा विवाह सोहळा केवळ पुस्तक वाटपामुळेच नव्हे, तर त्याच्या शिस्तबद्ध आयोजनामुळेही लक्षवेधी ठरला. लग्न सोहळा अगदी ठरलेल्या वेळेत पार पडला. स्टेजवर अनावश्यक गर्दी टाळण्यात आली होती. विशेष म्हणजे, फ्लेक्स आणि प्लास्टिक बॅनरला फाटा देऊन पारंपरिक फलक लेखनाचा वापर करण्यात आला होता. या आनंदाच्या निमित्ताने 'विद्यार्थी सहाय्यक समिती, पुणे' या संस्थेला भोजन निधीही देण्यात आला. डोक्यावरचा फेटा काही वेळातच बाजूला ठेवला जातो, मात्र हातात पडलेले पुस्तक आयुष्यभरासाठी विचारांची शिदोरी ठरते, अशा भावना उपस्थित पाहुण्यांनी व्यक्त केल्या. 'वऱ्हाडी' जेव्हा 'वाचक' होतात, तेव्हाच समाज खऱ्या अर्थाने समृद्ध होतो, हेच या अनोख्या विवाह सोहळ्याने सिद्ध केले आहे.

# पेसा ग्रामसभा मोबिलायझर्स पदे रद्द करू नका

## आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंचाची केंद्रीय मंत्र्यांकडे मागणी

अकोले (युवावार्ता प्रतिनिधी)- पंचायत (अनुसूचित क्षेत्रांचा विस्तार) अधिनियम १९९६ (पेसा कायदा) हा आदिवासी समुदायाला स्वशासनाचे अधिकार प्रदान करणारा ऐतिहासिक कायदा मानला जातो. २४ डिसेंबर १९९६ रोजी हा कायदा देशभर लागू करण्यात आला असून, त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी केंद्र व राज्य शासनाने पेसा ग्रामसभा मोबिलायझर्सची नियुक्ती केली होती.

प्रत्येक पेसा ग्रामपंचायतीत एक ग्रामसभा मोबिलायझर नेमण्यात आला असून, गेल्या आठ ते दहा वर्षांपासून पेसा क्षेत्रातील आदिवासी गावांमध्ये हे मोबिलायझर्स पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी कार्यरत आहेत.

मात्र, केंद्र शासनाने नुकत्याच घेतलेल्या निर्णयानुसार, यापुढे तीन ग्रामपंचायतींसाठी एकच पेसा ग्रामसभा मोबिलायझर नियुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्रातील सुमारे ३००० पेसा मोबिलायझर्सपैकी जवळपास २००० मोबिलायझर्सना कामावरून कमी करण्याची शक्यता निर्माण झाली आहे. हा निर्णय अन्यायकारक असून तात्काळ मागे घ्यावा, अशी मागणी आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंच आणि पेसा मोबिलायझर संघर्ष समिती, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने करण्यात आली आहे.



या मागणीसंदर्भात १६ मे २०२६ रोजी नवी दिल्ली येथे केंद्रीय आदिवासी विकास मंत्री जुएल ओराम यांची आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंचच्या राष्ट्रीय कार्यकारिणीने भेट घेतली. या शिष्टमंडळात माजी खासदार कॉ. वृंदा करात, त्रिपुरा विधानसभेचे विरोधी पक्षनेते कॉ. जितेंद्र चौधरी, राष्ट्रीय नेत्या कॉ. मरियम ढवळे तसेच मंचाचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी शिष्टमंडळाने आदिवासी भागातील भौगोलिक परिस्थिती व स्थानिक गरजा लक्षात घेता, पेसा ग्रामसभा मोबिलायझर्सची पदे कमी करण्याऐवजी त्यात वाढ करण्याची गरज असल्याचे स्पष्ट केले. आदिवासी विकासाला गती देण्यासाठी मोबिलायझर्सची भूमिका महत्त्वाची असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यासंदर्भात केंद्रीय आदिवासी विकास मंत्री जुएल ओराम यांनी शिष्टमंडळाकडून सविस्तर माहिती घेतली. पेसा मोबिलायझर्सची पदे कमी करणे योग्य ठरणार नाही, असे सांगत केंद्रीय ग्रामविकास मंत्रालयाशी समन्वय साधून हा निर्णय मागे घेण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी दिल्याची माहिती देण्यात आली.

INVOFIX SOLUTION PVT. LTD.
साठी खालील जागा भरणे आहे
JOB VACANCY
मार्केटिंग १० जागा
टेली कॉलिंग १० जागा
सेल्स ऑफिसर ०५ जागा
ड्रायव्हर ०२ जागा
अनुभवास प्राधान्य आकर्षक पगार दिला जाईल
- पत्ता- श्री स्वामी समर्थ एजन्सी, स्वागत मंगल कार्यालयासमोर अकोले बायपास रोड संगमनेर
- संपर्क - 7030334486 7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
पत्ता : दैनिक युवावार्ता कार्यालय, एस.टी. स्टँडजवळ, नविन अकोले रोड, संगमनेर ४२२६०५, जि. अहमदनगर (महाराष्ट्र),फोन (०२४२५) २२५१२९
Mobile : +91 9822039460, Email : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
शासनमान्य यादीतील जिल्हास्तरीय दैनिक
Print | Electronic | Social Media | Events | Publications | Magazine

दिनांक -१५/०५/२०२६

प्रिंट व डिजिटल पत्रकारीता प्रशिक्षणासाठी
श्रमसंस्कार व श्रमप्रतिष्ठा प्रकल्प

दैनिक युवावार्ता उपक्रमशील वृत्तपत्र असून ''**परिवर्तनाचा पुरस्कर्ता**'' हे ब्रिदवाक्य स्विकारून १८ वर्षापासून यशस्वी वाटचाल करीत असताना. संगमनेर - अकोले विद्यार्थ्यांसाठी दररोज दोन /चार तास '**कमवा - शिका**' योजनेप्रमाणे काम करण्याची संधी उपलब्ध करून देत आहे. कोणत्याही व्यक्तिच्या शिक्षणाबरोबरच श्रमसंस्काराद्वारे श्रमप्रतिष्ठा वाढावी म्हणून या प्रकल्पाचे प्रयोजन आहे. प्रसार माध्यम क्षेत्रातील प्रिंट व डिजिटल मिडिया प्रशिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना स्वावलंबी करणारा हा उपक्रम आहे.या उपक्रमात सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी संपर्क साधावा,सहभागी विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे निवड केली जाईल.

तसेच संगमनेर शहरातील दैनिक युवावार्ता वाचकांना संध्याकाळी ५:३० ते ७:३० या वेळेत युवावार्ता अंक पोहच करणे. महिना पूर्ण होताच ५० रू. बीलाप्रमाणे वसूली करून कार्यालयात जमा करणे, या प्रकारचे दोन तासाचे कामासाठी ३००० रूपये दर महिन्यास मानधन दिले जाईल.तसेच दररोज चार तास देऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जाहिरात संपर्क, बातमी संकलन, जाहिरात निर्मिती, मार्केटिंग या प्रकारचे कामासाठी प्रशिक्षणार्थी म्हणून दरमहा ५००० रूपये दर महिन्यास मानधन दिले जाईल. पुर्ण वेळ (आठ तास) काम करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना पात्रतेनुसार संधी दिली जाईल.

- हा उपक्रम विद्यार्थीनींसाठी नाही.
- इच्छूक विद्यार्थ्यांनी त्यांची माहिती फोटोसह व्हॉटसअॅप किंवा ई-मेलवर पाठवावी.
- निवड झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील माहिती मुलाखती द्वारे दिली जाईल.

श्रमसंस्कारांनी डॉ.अब्दुल कलाम देशाचे राष्ट्रपती झाले.
श्रमसंस्कारांनी लाल बहादूर शास्त्री देशाचे पंतप्रधान झाले.

व्हॉटसअॅप नं. - ९८२२०३९४६०
ईमेल - dailyyuvavarta@gmail.com

प्रकल्प प्रमुख
दैनिक युवावार्ता,
संगमनेर

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
डायलिसीस | सुसज्ज ऑपरेशन थिएटर | सीटी स्कॅन
सोनोग्राफी, २डी इको, एक्स रे | अत्याधुनिक लॅब | अत्याधुनिक आयसीयु
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या
स्त्रियांच्या समस्या
- मासिक पाळीच्या तक्रारी
- अंगावरून पांढरे जाणे
- गर्भ न रहाणे
- वारंवार गर्भपात होणे
- गर्भाशयात गाठी
- गर्भाशयाचा कर्करोग
- स्तनांची वाढ न होणे
- स्तनातून दूध न येणे
- स्तनात गाठी
- स्तनाचा कर्करोग
- योनी मार्गाची दुर्गंधी
- गुप्त अंगाला खाज
- विविध त्वचा विकार
- गुप्तरोग, गर्मी
- लघवीला जळजळ
- संभोगात रस न येणे
- संभोगा विषयीची भीती
- हस्तमैथूनाची सवय
- लैंगिक विकृती
- मानसिक नैराश्य

डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट
स्त्री रोग चिकित्सक
( ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव )
1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार | ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट
शालू | कांजीवरम | सिल्क | पैठणी | बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर 422605

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय रोग परिहाराय
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
अॅम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25